# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक 07/05/2023 (रविवार) दुपार**

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

पो.स्टे. अरोली :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा किरणपुर जंगली तुमसर रामटेक रोड येथे दिनांक ०६/०५/२०२३ चे ०५/०० वा. ते ०६/१५ वा. दरम्यान अरोली पोलीसांना गोपनीय माहीती मिळली की, मौजा किरणपुर जंगली तुमसर रामटेक रोड येथून अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. या मिळालेल्या माहिती वरून फिर्यादी व त्यांचे इतर सहकारी यांचेसह नमुद घटनास्थळी गेले असता १) ट्रक क्र. एम.एच.—३२/ए.जे.—४२६६ क्रमांकाचा ट्रकच्या चालकाला थांबवून तपासले असता सदर वाहनात चालक **आरोपी नामे—मनोहर महादेव कामडी वय ४० वर्ष रा गांधीनगर वर्धा २) मालक अमजद रफिक शेख रा वार्ड क्र. १७ देशकर हाउस जवळ वर्धा** यांनी संगनमत करून त्यांच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या ०९ ब्रास रेती किंमती अंदाजे २७०००/— रू. ची भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण १५२७०००/—रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोशि. रामरतन तिजारे ब नं ३३८ पो.स्टे अरोली यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास स.पो.नि. निशांत फुलेकर मो. नं ७५८८५६४३०० हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

२) पो.स्टे. भिवापूर :— अंतर्गत १०० मी. अंतरावरील पो. स्टे. भिवापुर टी पॉईन्ट येथे दिनांक ०६/०५/२०२३ चे ०५/४५ वा. ते ०६/१५ वा. दरम्यान टिप्पर वाहन क्र. MH-40-BG-8557 चा चालक **आरोपी नामे—रोशन बंडूजी नारनवरे वय २९ वर्ष, रा हळदगाव ता. उमरेड जि. नागपुर** याने त्याच्या ताब्यातील वाहनामध्ये अवैधरित्या विना परवाना ६ ब्रास रेती किंमती ३०,००० (तीस हजार) रू. भरून वाहतुक करतांना मिळुन आले. १० चाकी टिप्पर वाहन क्र. MH-40-BG-8557 किंमती २०,००,००० (वीस लाख) रूपये. असा एकुण वाहनासह २०,३०,०००/— रूपयाचा मुद्देमाल आरोपीकडुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पो.नि. जयपालसिंह गिरासे नेमणुक पो. स्टे. भिवापुर यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोना/१४७ अनिल कोकोडे पो. स्टे. भिवापुर मो. नं. ८३२९७९१६०५ हे करीत आहे.

# बॅटरी चोरी

**१) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील कांद्री माईन, रामटेक येथे दिनांक ०४.०५.२०२३ चे २०.०० वा. ते दिनांक ०५.०५.२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— देवेंद्र रामचंद्र मडावी, वय ३४ वर्ष, रा. कांद्री माईन वार्ड क्र. ०५ ता. रामटेक याचे रिलायन्स जियो टॉवर ODC चे आत लागलेले ३ बॅटरी पैकी ३ बॅटरी प्रत्येकी किंमती अंदाजे ७०००/— रूपये प्रमाणे एकुण किंमती अंदाजे २१०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोना/१९८८ नितेश पिपरोदे पोस्टे रामटेक मो. नं. ९९२१७११९५५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**